कादंबरी

# अपूर्ण संघर्ष

डॉ. पवन मांडवकर

गवळी प्रकाशन
माळगल्ली, सुभाष नागरी पतसंस्थेसमोर
इस्लामपूर, जि. सांगली
भ्रमणध्वनी ९८२२४०७३९५

मूल्य एकशे नव्वद रुपये

ISBN 978-81-953-704-4-1

अपूर्ण संघर्ष (कादंबरी)
Apurna Sangharsha (Novel)

|| प्राचार्य डॉ. पवन मांडवकर
Principal Dr. Pavan Mandavkar

संगणक
डॉ. पवन मांडवकर, डॉ.सौ. वीरा मांडवकर

लेखनस्थळ व कालावधी
१२ विंग, भारतीय वायुसेना (चंदीगढ), १९९०–९१

प्रकाशन १ मे, २०१८ (महाराष्ट्र दिन)

प्रथमावृत्ती प्रती १०००

प्रकाशिका / मुद्रक
सौ. वनिता राजेंद्र गवळी
गवळी प्रकाशन
द्वारा श्री. राजेंद्र शंकर गवळी (सिनेपत्रकार)
माळगल्ली, सुभाष नागरी पतसंस्थेसमोर
इस्लामपूर, जि. सांगली
भ्रमणध्वनी ९८२२४०७३९५

मूल्य १९० रुपये

# संघर्षाची पार्श्वभूमी

भारतीय वायूसेनेत एक सामान्य वायुसैनिक म्हणून कार्यरत असताना वेगवेगळ्या मानवी प्रवृत्तींचं, राजकारणाचं जवळून निरीक्षण करता आलं. माजी पंतप्रधान मा. राजीव गांधींच्या हत्येनंतर मा. पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाले. त्यांच्या सरकारने कार्यकाळ जरी पूर्ण केला तरी अनेक समस्या भेडसावत होत्या. त्यांच्यानंतर मा. व्ही.पी. सिंग, मा. चंद्रशेखर ही मंडळी पंतप्रधानपदी व मा. देविलाल हे उपपंतप्रधानपदी आरुढ झाले. त्यांनंतरही बराच काळ अस्थिरताच राहिली. सरकार अस्थिर असेल तर समस्या सर्वच क्षेत्रात कशा चारही दिशांनी आक्रमण करतात, ते या देशाने अनुभवलं.

अशा परिस्थितीत कुठलंही संवेदनशील मन पेटून न उठलं तर नवल! ज्या देशासाठी आपण आपले प्राण त्यागण्यासाठी तयार असतो, त्याच देशाचे राज्यकर्ते, सत्ताधारी, शासकीय अधिकारी मुडद्यांच्या टाळूवरील लोणीही खायला कमी करीत नाहीत, ही वस्तुस्थिती पाहिली आणि लेखणी पेटली, ती संघर्षाच्या रूपाने. पण हा संघर्ष पूर्ण होत नाही. तो सतत सुरूच असतो सत्ताधाऱ्यांच्या विरोधात, राजकारण्यांच्या विरोधात, समाजातील अनिष्टांच्या विरोधात.

जाती, पंथ, धर्म हे भेदाभेद या देशाच्या पाचवीलाच पुजलेले; पण येथे त्या पलीकडे जाऊन जाऊन विचार करणारं मन आहे. 'माणूस' म्हणून उदात्त विचारांचा स्वीकार आहे. भावभावनांच्या पातळीवर वाहावत जाणारं युवामन, पण त्याच बरोबर कर्तव्याची जाणीव सदैव जागृत ठेवून लढणारं परिपक्व मन येथे चित्रित केलं आहे. या कादंबरीतील 'मी' हा प्रातिनिधिक आहे. या 'मी'चा संघर्ष सतत सुरू राहावा, त्याकरिता जनसामान्यांनी 'मी' व्हावं, म्हणून हा खटाटोप!

दि. १ मे, २००४ — पवन मांडवकर

( ह्या कादंबरीचे कथानक आणि पात्रे काल्पनिक असून कथानकाचा सत्यघटनांशी आणि पात्रांचा जिवंत वा मृत व्यक्तींशी तंतोतंत संबंध जोडणे उचित होणार नाही. सोयीस्करपणे आपल्याला हवा तिथे, हवा तसा वाचकांनी संदर्भ जोडावा आणि अशक्यप्राय वाटणाऱ्या घटना व पात्रे काल्पनिक समजावीत.)